श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जून २०२२ | वर्ष-१०, विशेषांक | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२

## डेरवण येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंती साजरी




*श्री. देवदत्त राजोपाध्ये स्वा. सावरकरांना पुष्पांजली अर्पण करताना*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे डेरवण येथे शनिवार, दि. २८ मे २०२२ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त श्री. देवदत्त राजोपाध्ये यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. राजोपाध्ये यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर आणि लो. टिळक यांच्या स्मारकांना पुष्पांजली अर्पण करून संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात 'स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विचार' या विषयावर व्याख्यान दिले. व्याख्यात्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यावर सौ. पल्लवी तेंडुलकर यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला आणि सौ. शरयू यशवंतराव, शिक्षण संचालिका, यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ अर्पण करून व्याख्यात्यांचे स्वागत केले.

आपल्या व्याख्यानात डेरवण ट्रस्टने स्वा. सावरकर यांच्या विचारधारेला कसे मूर्तरूप दिले आहे याविषयी बोलताना श्री. राजोपाध्ये म्हणाले, ''..... मी आपल्याला एवढे सांगू इच्छितो की मी ज्या उद्देशाने या ठिकाणी आलो होतो, त्यापेक्षा माझा उद्देश अधिक सफल झाला आहे, सार्थ झाला आहे आणि मी मनाने अत्यंत समाधान पावलो आहे. हे मला सर्व या परिसरात आल्यानंतर आणि आपल्या सर्वांच्या सहवासातून लाभले. सावरकरांना नेमके अपेक्षित यापेक्षा काय होते? वनात जाऊन .. बसून .. तपश्चर्या करावी, या वृत्तीचे ते नव्हते. त्यांच्या मनामध्ये हेच होते, की समाजामध्ये राहून काम करणे. या ठिकाणी मला काय पाहायला मिळाले? ज्ञानयोग पाहायला मिळाला, कर्मयोग पाहायला मिळाला आणि भक्तियोग पाहायला मिळाला. ज्ञानेश्वरी यापेक्षा वेगळी नाही. गीता

तर त्याहीपेक्षा वेगळी नाही. गीतेनेसुद्धा आपल्याला तत्त्वज्ञान तेच सांगितले आहे. आणि ते सर्व मला या ठिकाणी पाहायला मिळाले. मी आपल्याला आवर्जून सांगू इच्छितो, की सावरकरांबद्दल बोलत असताना सावरकरांचा इतिहास, त्यांनी केलेले काम, हे मी तुम्हाला नव्याने सांगायची गरज नाही. आपल्यातील अनेकांना ते माहिती आहे, बहुतेकांनी ते वाचलेले आहे, बहुतेकांनी ते अनुभवलेले आहे. तपशिलामध्ये न शिरता मी आपल्याला सांगू इच्छितो की, आज माझ्यासमोर बसलेल्या ज्या पहिल्या दोन-तीन ओळी आहेत, ते मला सर्व वंदनीय आहेत.

मागे बसलेली जी मुले आहेत, त्यांच्यासाठी मी एवढे सांगू इच्छितो, की तुमचे भाग्य आहे की तुम्हाला अशा परिसरामध्ये शिकायला मिळते आहे. कितीतरी मेडिकल कॉलेजवर वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी मी गेलो होतो, अनेक ठिकाणे मी जवळून पाहिलेली आहेत. ३६ वर्षांची पत्रकारिता करीत असताना मला जवळून या सगळ्या गोष्टी पाहायला मिळाल्या. पण मी विनम्रपणाने हे मान्य करतो, आपल्याला सांगू इच्छितो, की या मुलांचे भाग्य आहे, की त्यांना या परिसरामध्ये शिकायला मिळते, राहायला मिळते. 'पुष्पसंपर्के मातीस वास लागे' त्याप्रमाणे इथल्या कणाकणाला, इथल्या मातीला एक वेगळा सुगंध प्राप्त झालेला आहे. आपले काम प्रामाणिकपणाने करायचे, हीच ईश्वरभक्ती, हीच खरी राष्ट्रभक्ती आहे. अन्यथा मोठ्यामोठ्या गप्पा मारायच्या आणि काहीतरी वेगळेवेगळे करत बसायचे आणि स्वतःला वेगळे समजायचे, यात काही राष्ट्रभक्ती नाही किंवा देशभक्ती नाही.

सकाळीच मी काकांना काही प्रश्न विचारले, की समाजामध्ये वागायचे कसे, 'नटखटासी नटखट, उद्धटासी उद्धट, ठकासी आणावा ठक, महाठकासी महाठक' हे करायचे, का वेगळ्या पद्धतीने जायचे? त्यांनी मला सांगितले, 'तो समर्थांचा काळ वेगळा होता. त्या काळामध्ये ते योग्यही होते. आज परिस्थिती बदललेली आहे. त्यामुळे तुम्हाला जर आपले काम करायचे असेल, तर संघर्ष टाळून समन्वयाच्या माध्यमातून तुम्हाला आपले एकएक पाऊल पुढे टाकून समाजाची प्रगती, आत्मोन्नती करता आली पाहिजे, आणि ती साधता आली पाहिजे.' साधुतुल्य ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व, प्रसंगी अंतरावर राहून, प्रसंगी आपल्यामध्ये मिसळून हे सगळे करते आहे, हेच खरे सावरकरांचे काम आहे. सावरकरांना भाषणे अपेक्षित नव्हती, सावरकरांना कृती अपेक्षित होती. सावरकरांना अपेक्षित यापेक्षा वेगळे काय होते? 'जे देशासाठी लढले, ते अमर हुतात्मा झाले ।' हे जरी खरे असले तरी आपल्याला शिकवले जाते, 'दे दी आजादी तूने बिना खड्ग बिना ढाल।'

मला कळत नाही याचा नेमका अर्थ काय होतो. ज्यांनी हे हाल सोसले, त्यांनी ह्या ठिकाणी किती हालअपेष्टा सोसल्या, प्रखर राष्ट्रभक्ती म्हणजे काय, यच्चयावत संपूर्ण शरीर अर्पण करायचे म्हणजे काय, आणि शरीराच्या डोक्याच्या केसापासून तळपायाच्या शेवटच्या टोकापर्यंत ज्यांची हाल-अपेष्टा सातत्याने सोसत वाटचाल झाली, जे हुतात्मे झाले, 'अनामवीरा जिथे जाहला तुझा जीवनांत, स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली ना वात ।' अनेक लोक धारातीर्थी पडलेले असताना समाजामध्ये वेगळे चित्र निर्माण केले जाते. पण खरा इतिहाससुद्धा लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. यासाठी वाचनाला पर्याय नाही. मला मान्य आहे की सावरकरांचे विचार सर्वांना आत्मसात करणे अवघड आहे, कारण खरे काय आहे, त्यांचे दुर्दैव! तो एकमेव असा नेता आहे, एकमेव सर्वश्रेष्ठ व्यक्ती अशी आहे, की जी विरोधकांना कळली नाही आणि अनुयायांना रुचली नाही, प्रसंगी पचली नाही. अशी सगळी उपेक्षा त्यांच्या वाट्याला येऊनसुद्धा, उपेक्षितांचे अंतरंग सातत्याने जाणतजाणत आपल्या आयुष्यातले टप्पे त्यांनी पुरे केलेले आहेत. ते सगळे समोर ठेवून आपण त्यांच्यापासून काय घ्यायचे?

समर्थ रामदासांनी सांगितल्याप्रमाणे 'उत्तम तितुके घ्यावे, मिळमिळीत अवघेची त्यागावे ।' हेसुद्धा त्यांच्याकडून आपल्याला शिकायचे आहे. शेवटच्या कालावधीमध्ये प्रायोपवेशन ज्या वेळेला त्यांनी केले, ते प्रायोपवेशन असतानासुद्धा त्यांनी संत साहित्याच्या माध्यमातून तो प्रायोपवेशनाचा एकएक क्षण हा गतप्राण होईपर्यंत पुढेपुढे सरकवलेला आहे. 'नौजवान सैनिका पुढेच जायचे । न मागुती तुवा कधी पहायचे । बर्फाचे तट पेटूनी उठले । सदन शिवाचे कोसळते । रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते । असुरांचे पद भ्रष्ट लागुनी । आज सतीचे पुण्य मिळे । अशा घडीला कोण करंटा तटस्थतेने दूर पळे ।' हेही त्यांनी आत्मसात केलेले होते. समाजामध्ये मला काय त्याचे, कोणी कोणाशी भांडते आहे, मला काय करायचे आहे, मुलगा कसा वागतो आहे, मला काय करायचे आहे, बहीण अशी वागते आहे, मला काय त्याच्याशी कर्तव्य आहे, ही अशी तटस्थता, या समाजाला विनाशक आणि विघातक प्रवृत्तीकडे नेत असते, याचे भान आज सर्वच लोकांनी ठेवले पाहिजे. शिक्षक कसा असावा?

*श्री. देवदत्त राजोपाध्ये हे विटा येथील 'यशवंतराव चव्हाण मोफत वाचनालय आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र' या संस्थेचे संस्थापक आहेत. स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या मुलांना सर्व प्रकारचे साहाय्य उपलब्ध करून देणे हे त्यांचे व्रत आहे. या केंद्रात गरीब, गरजू मुलांना मोफत भोजन, निवासव्यवस्थेपासून सर्व प्रकारे मदत दिली जाते. गेल्या पंचवीस वर्षात त्यांचे केंद्र सात हजारावर मुलांना सरकारी सेवेत अधिकारी म्हणून निवडले जाण्यात साहाय्यभूत ठरले आहे. २००६ साली त्यांचा विद्यार्थी युपीएससी परीक्षेत देशात प्रथम आला. मराठी साहित्य परिषद, विटा शाखेचे अध्यक्ष तसेच अ. भा. नाट्य परिषद विटा शाखेचेही ते अध्यक्ष आहेत. आपले केंद्र त्यांनी कोणाचेही आर्थिक साहाय्य न घेता, आपल्या हिमतीवर चालविले आहे. प्रामाणिक सरकारी अधिकारी निर्माण करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.*



सौ. शरयू यशवंतराव यांच्या हस्ते श्री. देवदत्त राजोपाध्ये यांचे स्वागत

या ठिकाणी उदाहरण देताना श्री. म. माटे यांच्या सान्निध्यामध्ये ते आले होते. एक लेंगरे नावाचे गाव होते. त्यामध्ये सावरकर काही काळाकरिता गेले होते. त्यांनी विचारले 'या ठिकाणी शिक्षक किती आहेत?' शिक्षकाच्या दर्जावरून शिक्षकाच्या धोरणावरून, शिक्षकाच्या मांडणीवरून, गावाची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संपन्नता कळते.

त्यांना तिथल्या ग्रामस्थांनी सांगितले, की त्या लेंगरे गावामध्ये एक उरूस भरलेला होता. एक जत्रा होती. त्या काळामध्ये आर्थिक दैन्य, दुःख आणि दारिद्र्याने पछाडलेल्या समाजामध्ये घरात खायला अन्न नाही, अशा वेळेला काहीतरी आपण जत्रेमध्ये जावे, यात्रेमध्ये जावे, आणि त्या यात्रेमध्ये गेल्यानंतर तरी आपल्याला कोणी खायला देते का, प्यायला देते का याचा आपण विचार करावा. अशा विचाराने एक कुटुंब तेथे गेलेले असते. आणि ते कुटुंब गेल्यानंतर प्रत्यक्षात मात्र दिवसभर त्यांना काही खायला मिळत नाही, आणि नवरा बायकोचे भांडण त्या ठिकाणी होते. पोटच्या पोराला आपण अन्न देऊ शकत नाही, यासाठी विमनस्क झालेला बाप, काहीतरी मदत मिळते का म्हणून इकडेतिकडे फिरत असताना कोणीच काही प्रतिसाद देत नाही, म्हणून तो एक आड जवळ करतो, विहीर जवळ करतो. संध्याकाळ होते, पालं उलगडतात, आणि त्या मुलाची आई, म्हणजे जो बाहेर गेला, त्याची पत्नी, हीसुद्धा त्याला हुडकण्यासाठी बाहेर जाते. मुलाला सांगते, 'बाळा इथे बस. मी तुला काहीतरी खायला घेऊन येते. तुझे बाबा तुला काहीतरी खायला आणायला गेले आहेत.' आणि ती आईसुद्धा जाते. तिला कळते की या विहिरीमध्ये तिच्या पतीने प्राण दिलेला आहे, उडी घेतलेली आहे, तीही त्या ठिकाणी उडी घेते आणि ते दोघेही परत येत नाहीत. संध्याकाळ होऊन गेलेली असते. आणि त्या काळच्या शिक्षकांची एक सवय असायची. तशीच श्री. म. माटे यांना होती. त्यांची पद्धत अशी होती, यात्रा असो, जत्रा असो, अगर साधा दिवस असो, गावात सर्वत्र फिरल्यानंतर कोणी उपाशी आहे का, जेवला आहे का, कोणी दुःखी आहे का, कोणी कष्टी आहे का ते पाहात असत. आणि त्यांना बरोबर तो मुलगा सापडला. मुलगा रडत होता. त्याला विचारले 'बाळ काय झाले?' त्याने सांगितले, आई गेली, बाबा गेले. तो पोरका झालेला मुलगा पाहून त्यांचे मन द्रवले. त्याचे नाव होते बन्सीधर. 'आई गेली, बाबा गेले, बन्सीधरा आता कोठे रे जाशील?' ही कथा त्यांनी लिहिली, ही कथा सावरकरांना भावली. सावरकर समाजामध्ये गेल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी जे जे काही मिळेल, ते जास्तीत जास्त उघडपणाने घेण्याचा प्रयत्न करायचे.

दुसरे एक गुंडो दासो कंपली नावाचे शिक्षक होते. आणि स्वातंत्र्यचळवळीमध्ये स्वतःला वाहून घेतलेली ती व्यक्ती होती. शिक्षकाने किती आत्मीयतेने शिकावे आणि किती आत्मीयतेने शिकवावे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हे सर! पहाटे साडेतीन वाजता उठून हा माणूस १४ भाषांचा अभ्यास करत होता. स्वातंत्र्य संग्रामाच्या चळवळीमध्ये सहभागी होत होता, आणि योगायोगाने, दुर्दैवाने त्यांचा मुलगा काहीतरी साथ आली आणि साथीच्या रोगामध्ये गतप्राण झाला. जी गोष्ट लोकमान्य टिळकांच्या बाबतीतही घडली होती. 'होळी पेटलेली आहे, माझी एखादी आहुती त्यात पडली तर काय झाले !' असे ते त्या वेळी म्हणाले होते. लोकमान्य टिळकांचे धाडस आणि साहस, एका शिक्षकामध्येसुद्धा तसे होते, सावरकर त्यांना भेटले. लक्षात आले की यांचे नेमके वेगळेपण काय आहे. त्या माणसाचे वेगळेपण असे होते, की तो मुलगा गतप्राण झालेला होता, त्या मुलाला घरी आपल्या मांडीवर घेतलेले होते, आणि त्या वेळेला आपल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी बोलावले, आणि 'राजहंस माझा..' ही कविता त्यांनी शिकवली, आणि ती कविता ज्या अर्थाची होती, एक बाळ गेलेले असते. ते एका आईच्या मांडीवर असते आणि आई सांगत असते माझा बाळ शांत झोपी गेलेला आहे. कोणी रडू नका, कोणी त्याला उचलू नका. त्याची झोपमोड होईल असे काही करू नका. त्याच वेळेला ती कविता शिकवायची. दुर्दैवाने कोणावर असा प्रसंग येऊच नये. परंतु आलेल्या प्रसंगाचेसुद्धा रूपांतर त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवण्यामध्ये कसे केले? उत्कट जे भाव असतात ते त्याच वेळेला निर्माण होतात, जेव्हा ती व्यक्ती त्या भूमिकेमध्ये शिरते. हे सावरकरांनी टिपलेले होते. शिक्षकांच्या सभेमध्ये गेल्यानंतर सावरकर सांगायचे, शिक्षक श्री. म. माटे यांसारखे तयार झाले पाहिजेत. हे मी आवर्जून पाहतो आहे आणि आपल्याला सांगतो आहे.

मला सावरकर खरे वेगळे सांगायचे होते. परंतु ज्या वेळेला मी इथे आलो आणि इथे पाहिले, आल्या क्षणी वॉचमनपासून ते उच्चविद्याविभूषित सर्व डॉक्टर लोकांपर्यंत, माझ्याबरोबर असलेले २-३ सहकारी, आपल्या संस्थेचे पदाधिकारी असतील, किंवा ही



*श्री. देवदत्त राजोपाध्ये आपले विचार व्यक्त करताना*

सगळी पहिली रांग मी जेव्हा पाहिली, सात्त्विकता, नम्रता, साधेपणा, सरळपणा, शुचिर्भूतपणा यापेक्षा वेगळा काय असू शकतो? आणि हे जे नेमके सावरकरांना अपेक्षित होते, तेच काम तुम्ही करता आहात. म्हणजे तुमच्या नसानसामध्ये सावरकर भेटत आहेत. इथल्या कणाकणामध्ये मला सावरकर दिसत आहेत. इथल्या प्रत्येक नजरेमध्ये मला सावरकर दिसत आहेत. श्रीकाका ज्या वेळेला असे दोन हात जोडून नमस्कार करायचे, प्रत्यक्षात तो नमस्कार असायचा, पण लोक तो आशीर्वाद म्हणून स्वीकारायचे, हे मी पाहिले. प्रत्येक व्यक्तीला ते आपले वाटतात.

'थोर महात्मे होऊन गेले । चरित्र त्यांचे पहा जरा । आपण त्यांच्या समान व्हावे । हाची सापडे बोध खरा ।' हा बोध या ठिकाणीच आपल्याला मिळतो. 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती, तेथे कर माझे जुळती ।' इथे कर जुळायला काहीच अडचण नाही. बोरकरांनी एका ठिकाणी असे सांगितले आहे, 'पक्व फळापरी मीपण ज्यांचे सहजपणाने गळले हो, जीवन त्यांना कळले हो । आपत्काली अन दीनांवर घन होउनि जे वळले हो, जीवन त्यांना कळले हो ।' जिथे जाल तिथे मिसळून, जिथे जाल त्या ठिकाणी आपले समजून काम करणारी माणसे, ही स्वातंत्र्यदेवतेला अपेक्षित आहेत. स्वातंत्र्यदेवता म्हणजे कोणी आता इथे देवी उभी राहणार नाही. इथे काही संघर्ष करावा लागणार नाही. कोणाला बंदुका घेऊन जावे लागणार नाही, कोणाला पिस्तुले इकडची तिकडे न्यावी लागणार नाहीत. कोणाला सशस्त्र क्रांतीची आजमितीला तरी गरज नाही. परंतु सशस्त्र क्रांतीची गरज नसतानासुद्धा तुमचे मन, मनगट आणि मेंदू तुम्ही शाबूत ठेवला पाहिजे. 'केला पोत जरी बळेची खाली', कोणी जरी तुम्हाला मुद्दाम वळवायचा प्रयत्न केला, तुम्हाला विरोध करायचा प्रयत्न केला, तुम्हाला उलटे करायचा प्रयत्न केला, 'ज्वाला तरी ते वरती उफाळी', तशा ज्वाला उफाळल्या पाहिजेत.

पण त्या समोर पहिल्या, दुसऱ्या रांगेत बसलेल्या पिढीच्या नव्हेत. त्यांनी संथ, अत्यंत शांतपणाने, 'संथ वाहते कृष्णामाई' तसेच वागले पाहिजे. परंतु तुम्ही आज वेगळ्या पोशाखातील वेगळ्या गणवेशातील मुले आहात, आणि हे शिकले पाहिजे की पैसा कोणीही मिळवील. पैसा मिळवायला फारशी अक्कल लागत नाही. एका सत्पुरुषाने असे म्हटलेले आहे, अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, मुलांचे शिक्षण, त्यासाठी योग्य पैसा तुम्हाला मिळतच असतो. तो पुरेसा पैसा तुम्हाला मिळाला, तर भगवंताची तुमच्यावर कृपा आहे असे समजा. त्यापेक्षा अधिक मिळाला, तर भगवंत तुमची परीक्षा बघतो आहे असे समजा. एका बाजूला अनेकांची भगवंत वेगळ्या अर्थाने परीक्षा बघत असतो, पण आपल्याला याचा अर्थ कळत नाही. ते इथे शिकायला मिळते. मला या मुलांसाठी असे सांगायचे आहे, की तुमचे भाग्य आहे.. .. मी आल्याआल्या जे पाहिले ना, अरे ते तुम्हाला नाही कुठे बाहेर मिळणार! मग तुम्ही वैद्यकीय क्षेत्राशी निगडित असाल, कोणी फिजिओथेरपिस्ट असाल, कोणी एमबीबीएसच्या फर्स्ट इयर, सेकंड इयर, थर्ड इयरला असाल, परंतु हे तुम्हाला कुठेही पाहायला मिळणार नाही. हे जे गाव वसवल्यासारखे आहे, यापेक्षा वेगळा स्वर्ग नाही. मला कोणाचेही कौतुक करण्याची सवय नाही. माझा तो स्वभावही नव्हे. परंतु ज्या वेळेला मी हे पाहिले, त्या वेळेला विनम्रतेनेसुद्धा लाजावे, आणि तिनेसुद्धा लाजेने मान खाली घालावी, असे हे सगळे आहे.

ज्या डॉक्टरांची भेट घ्यायला तुम्हाला पाच-पाच, सहा-सहा महिन्यांचा वेळ लागू शकतो, एखाद्या पेशंटवर उपचार करायचे तर लाखो रुपयांचा निधी तुम्हाला लागू शकतो, आणि त्यापेक्षा एक वेगळे टेन्शन असते, डॉक्टर परत भेटतील की नाही, वेळ देतील की नाही, काय मला कळत नाही, पण खूप वेळा डॉक्टरांनी पेशंटकडे पाहायचेच नसते अशी एक नवीन कन्सेप्ट आली आहे. म्हणजे पूर्वी जी फॅमिली डॉक्टर नावाची संकल्पना होती, ती संकल्पना आता कालबाह्य झालेली आहे. या मुलांना ते शिकवले पाहिजे, की आता तुम्ही फॅमिली डॉक्टर बना. मेडिकलायझेशन नावाची जी नवीन संकल्पना आलेली आहे, ती अजिबात असता कामा नये. ती अस्तांगताला गेली पाहिजे. एक विषयाचा एक्सपर्ट जो आता आहे, ते एक्सपर्ट नॉलेज तर तुम्हाला पाहिजेच, पण त्याहीपेक्षा ते नॉलेज मिळवत असताना, तुम्ही समाजमनाचे डॉक्टर बनला पाहिजेत. तुम्ही त्याचे हृदय वेगळ्या अर्थाने तपासता, पण हृदय नावाचा जो भाग असतो, मन नावाचा जो भाग असतो, काळीज नावाचा जो भाग असतो, तो तुम्हाला कळला पाहिजे आणि तो तुम्हाला तपासता आला पाहिजे. आणि शेवटी 'दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।' अलीकडे त्या पसायदानाचीसुद्धा टिंगल करतात. अरे पण पसायदान काय आहे? 'जो जे वांछील तो ते लाहो' चा अर्थ ज्याला चोरी करायची आहे त्याला चोरी करता यावी, ज्याला घुसखोरी करायची आहे त्याला करता यावी, असा नाही.

ज्ञानेश्वरीचे पसायदान वाचल्यानंतर आपल्याला लक्षात येते, तुमची दुष्ट प्रवृत्ती, खलप्रवृत्ती गेली पाहिजे. ती गेल्यानंतर मग तुम्हाला 'जो जे वांछील तो ते लाहो'. जर तुम्हाला जीवनाचा खरा अर्थ कळलाच, आणि तुम्ही मांसाहार करणारच नाही, अशी खात्री झाल्यानंतर जर तुमच्यासमोर, मांसाहाराचे ताट ठेवले आणि 'पाहिजे ते खा', तर खाल का हो तुम्ही? नाही खाणार. तुम्हाला एकदा शाकाहारी बनवले आहे. तुमची वृत्ती आहारप्रसंगी एकवेळ मांसाहारी असली तरी चालेल, पण वृत्ती शाकाहारी असली पाहिजे. त्या वृत्तीने तुम्हाला वागता आले पाहिजे, त्या वृत्तीने तुम्हाला जगता आले पाहिजे. मी आपल्याला सांगत होतो, किती जणांनी केशवसुत वाचले? किती मुलांनी आमच्या कुसुमाग्रज वाचले आहेत? सावरकरांचे वर्णन करायचे झाले तर चार ओळींमध्ये आहे बघा. या तंतोतंत ओळी त्यांना लागू आहेत. 'पदोपदी पसरून निखारे आपुल्याच हाती । होऊनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती। विश्रांतीस्तव कधी न थांबलो पाहिले न मागे । बांधू न शकलो प्रीतीचे वा कीर्तीचे धागे । एकच ताळा समोर आणिक पायतळी अंगार । गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ।।'

तो क्रांतीचा जयजयकार करणारा हा नव्या पिढीमध्ये, त्यांच्या नसानसामध्ये कधी येणार? त्यांच्या नसानसामध्ये ते चैतन्य कधी पेटणार? का पिढी मरगळलेली? का तरुणांची संख्या आणि मुलींची संख्या ही वेगळ्या विश्वात नांदणारी? सुदैव आहे की इथे मला काहीच हुडकायचे म्हटले तर चूक सापडत नाही. बारकाईने पाहिले, वेगळ्या नजरेने जरी पाहिले, तरी इथल्या मुलांच्यावर असलेले संस्कार, आज एक वेगळा धडा मी इथून घेऊन जातोय. संस्कार महत्त्वाचे आहेत, पण शिस्त असेल, तरच त्या संस्काराला अर्थ आहे. शिस्त नसेल, तर त्या संस्काराला खऱ्या अर्थाने अर्थ नाही. म्हणजे ते सर्व आहे ते या ठिकाणी आपल्याला पाहायला मिळते.

मला आपल्याला हे सांगायचे होते, हा प्रसंग कशावरून निघाला? बालगंधर्व रंगमंदिर, जे आता पाडायला सगळे जण निघालेले आहेत, त्याचे वेगळ्या अर्थाने कमर्शियल संकुल करायचे आहे. तिथे बालगंधर्वांचा एक स्त्री वेषातील फोटो आहे, आणि एक पुरुष वेषातील फोटो आहे. हे सावरकरांशी निगडीत आहे म्हणून सांगतो आहे आपल्याला. तर ते फोटो ज्या वेळेला त्यांचे काढले गेले, एक स्त्री वेषातला आणि एक पुरुष वेषातला, सावरकरांनी सांगितले, ही दोन चित्रे आहेत, एकाच व्यक्तीची आहेत, पण कळणार कसे? बहीण-भाऊ आहेत, आई-वडील आहेत, गुरु-शिष्य आहेत किंवा मित्र-मैत्रीण आहेत, कळणार कसे? याचे वेगळेपण आणि त्याचे वेगळेपण मुद्दाम वेगळे लिहिले गेले पाहिजे. नव्या पिढीला ते कळले पाहिजे, अन्यथा ते कळणार नाही. त्या वेळेला सावरकरांनी सूचना केली, 'त्याच्याखाली काही ओळी गदिमांच्याकडून तुम्ही लिहून घ्या.' आणि पु. ल. देशपांडे स्कूटरला किक मारून पंचवटीमध्ये गेले, आणि पंचवटीमध्ये गेल्यानंतर त्यांनी त्यांना सांगितले की असेअसे आहे आणि आपल्याला असेअसे पाहिजे आहे. मग त्यांनी खाली ओळी लिहिल्या.

काही माणसे फक्त राजकीय असतात, काही माणसे फक्त नाट्य क्षेत्रात काम करतात, काही साहित्य क्षेत्रात काम करतात, सामाजिक क्षेत्रात करतात, काही काहीच करत नाहीत परंतु सावरकरांचे वेगळेपण काय होते, अष्टावधानीपणा होता. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे काय! या अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या अनेकांना माहिती नाहीत, कारण या गोष्टी पडद्याआडच्या आहेत. या पुढे आणल्या जात नाहीत, कारण कोणीतरी सुचवलेले असते.

मग गदिमांनी त्याखाली लिहिले, स्त्रीवेशाखाली लिहिले, 'रतीचे जया रूप लावण्य लाभे, कुलस्त्री जसे हास्य ओठात शोभे । सुधेसारखा स्वाद स्वर्गीय गाणे । असा बालगंधर्व आता न होणे।।' आणि पुरुष वेशाखाली लिहिले, 'जशा जन्मती तेज घेवोनी तारा, जसा मोर घेवोन येतो पिसारा । तसा येई कंठात घेऊन गाणे, असा बालगंधर्व आता न होणे ।।'

गदिमांना गीतरामायण लिहा, असा निरोप कोणी दिला असेल? सावरकरांनी आणि गीतशिवायन लिहा असा आदेशही त्यांना दिलेला आहे. कारण तुम्ही जर गीतशिवायन लिहिलेत तर ते गीत रामायण काय लिहिले, ते तुम्हाला कळू शकेल, तुम्हाला त्याची जाणीव होईल, हे त्यांना त्यांनी सांगितले आणि मग गदिमांच्या तोंडून हे शब्द गेले. याची जी संकल्पना होती, त्यांनी ज्या वेळेला सावरकरांची व्याख्याने ऐकली होती, जयंतराव टिळकांनी आपल्या भाषणामध्ये अनेक ठिकाणी याचा उल्लेख केलेला आहे. कारण टिळक फॅमिलीचा आणि सावरकरांचा फार जवळचा संबंध होता. कर्वे रोडच्या सुरुवातीला असलेल्या ज्या ठिकाणी परदेशी मालाची होळी झाली, तिथे लोकमान्य गेलेले होते. आणि सगळे आरोप लोकमान्यांच्यावर आले. सावरकरांच्या सर्व सरकारला न पटणाऱ्या गोष्टींचे आरोप लोकमान्यांवर आले. आणि त्यानंतर जे काही हुतात्मा झाले, त्यांनी सशस्त्र क्रांतीदल उभारले, त्याचेसुद्धा सर्व खापर सावरकरांच्या डोक्यावर आणि माथ्यावर आलेले आहे. काही गोष्टी त्यांच्या परस्परही घडल्या, पण काही त्यांच्या प्रेरणेतून घडल्या, त्या प्रेरणेतून घडलेल्या गोष्टींचे श्रेय त्यांना मिळाले नाही. परंतु परस्पर घडलेल्या गोष्टींचे खापर मात्र त्यांच्यावर आले. असा अनेक अँगलने त्यांच्यावर तो अन्याय झाला होता. म्हणून मी त्याचे एक वेगळे स्वरूप आपल्याला सांगतो, की गीतरामायणामध्ये ज्या अनेक गोष्टी आहेत, गीतरामायणामध्ये एके ठिकाणी म्हटले आहे, सीतेला सोडायचे असते वनामध्ये, आणि लक्ष्मण त्या ठिकाणी रथ घेऊन निघालेला असतो. सीतेला असे वाटते, की खरंच माझे डोहाळे

पुरवण्यासाठी मला नेत आहेत, या भावनेतून सीता जाते आणि प्रत्यक्ष ज्या वेळेला त्या ऋषींच्या आश्रमाच्या अलीकडे लक्ष्मण रथ उभा करतो आणि सांगतो, 'सीतामाई असे नाही आहे, तुम्हाला सोडायला आलो आहे. तुम्हाला निरोप द्यायला आलो आहे.' त्या वेळेला सीतामाई त्यांना सांगते, 'इथून वंदिते मी मातांना', म्हणजे एक स्त्री, नवऱ्याने आणि घरातल्या सर्व सासरच्या लोकांनी त्याग केल्यानंतरसुद्धा ती सहृदय असू शकते, 'इथून वंदिते मी मातांना।' माता म्हणजे सासू. 'इथून वंदिते मी मातांना, प्रणाम पोहोचवी रघुनाथांना ।' माझा जो नाथ आहे श्रीराम, त्याला माझा प्रणाम पोहोचव. 'आशीर्वच घे तुज जाताना । आणखी ओठी ना शब्द फुटे । मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे । पतीचरण पुन्हा मी पाहू कुठे ।' त्यांच्या काव्यामध्ये पुढे जे आले आहे, सीतेला पळवून नेले जाते. 'ही तिच्या वेणीतील फुले, लक्ष्मणा तिचीच ही पावले । एक पदांचा ठसा राक्षसी, छेदित गेला पदचिन्हासी ।' राक्षसी ठसा कसा एक छोट्या-छोट्या पदाचिन्हांना छेदत गेला आहे, आधी सीता पळत होती, मागून रावण पळत होता. त्याचे वर्णन करताना, ही काव्यात्मकता आली कुठून? क्रांतिकारी सावरकर अनेकांना माहीत आहेत. साहित्यिक सावरकर जे होते, त्या साहित्यिक सावरकरांच्या माध्यमातून अनेक कवितांचा उदय झालेला आहे. साहित्यिक सावरकरांच्या साहित्यामधून आणि त्यातून प्रेरणा घेऊन एक पिढीच्या पिढी पुढे आलेली आहे आणि का आली, कशासाठी आली, तर त्यांच्यामध्ये अत्यंत चांगला समन्वय होता. त्यांच्यामध्ये अत्यंत चांगली देवाणघेवाण होती. त्यांच्यामध्ये अत्यंत चांगली आपुलकी होती, जिव्हाळा होता. कोणीतरी काव्य करायची, कोणीतरी ती म्हणायची, त्याला कोणीतरी निधी द्यायचा, आणि तो स्वातंत्र्य चळवळीला पार पडायचा. हे सगळे होते. तुमच्या परिसरातले बा. भ. बोरकर एके ठिकाणी म्हणतात, जगामध्ये कुठलीच गोष्ट सहजासहजी मिळत नाही. म्हणजे मला वाटते कालच एकाने मला वाक्य सांगितले की, आपल्याच कुठल्यातरी कार्यालयात लिहिले आहे, की प्रत्येक चांगली गोष्ट शिक्षेशिवाय मिळत नाही, काहीतरी पनिशमेंट झाल्याशिवाय मिळत नाही. काहीतरी पाहिजे असेल तर काहीतरी तुम्हाला त्याग करावा लागतो, द्यावेच लागते, ही प्रेरणासुद्धा सावरकरांच्या काव्यातून आलेली आहे. तुम्ही आता तरुण मुले आहात, तरुण मुली आहात, म्हणून तुम्हालासुद्धा काहीतरी ते कळावे की काय वाचावे आणि त्यातूनसुद्धा काय घ्यावे. बोरकर एका कवितेत म्हणतात, 'त्या नदीच्या पार वेड्या यौवनाचे झाड आहे । अमृताचा चंद्र त्याच्या पालवीच्या आड आहे ।' प्रत्येक गोष्ट मिळवताना काही ना काही आड आहे. 'रे मदाचे झाड आहे, अमृताची वेदना अन् सुखाच्या आत आहे शापणारी यातना ।' प्रत्येक शापणारी यातना घेऊनच तुम्हाला सुखाचा शोध घ्यावा लागतो. 'मन शुद्ध तुझं गोष्ट आहे पृथ्वीमोलाची, तू चाल पुढं तुला रं गड्या भीती कशाची, पर्वा बी कुणाची ।। झेंडा भल्या कामाचा जो घेउनि निघाला, काटंकुटं वाटंमंदी बोचति त्येला । रगत निगंल, तरि बी हंसल, शाबास त्येची, तू चाल पुढं, तुला रं गड्या भीती कशाची, पर्वा बी कुणाची ।।' आज मला काकांच्याशी बोलताना ही कविता आठवली.

नवी पिढी ज्या वेळेला समोर येते, संकटाला सामोरे जात असताना, फक्त पैशाच्या मागे न लागता किंवा कोणाची लाचारी न स्वीकारता आपण किती स्वाभिमानाने समाजाला सामोरे गेले पाहिजे, किती स्वाभिमानाने समाजातल्या अडीअडचणी सोडवल्या पाहिजेत, मानवता धर्म आपण कसा लोकांपर्यंत पोहोचवला पाहिजे, सावरकरांना अभिप्रेत असलेला तरुण, अभिप्रेत असलेला डॉक्टर, अभिप्रेत असलेला समाजसेवक, कसा निर्माण झाला पाहिजे, त्याचे नकळत आणि कळत संस्कार होत आहेत. म्हणजे इथे जर एखादा कोणी लेखक आला, तर तुमची संस्था ही कादंबरीचा विषय आहे. म्हणजे तुम्हाला बरे वाटावे यासाठी मी सांगत नाही, परंतु ते इतके पैलू तुमच्यामध्ये जपलेले आहेत, किती विद्वान माणसे, किती उच्च माणसे, त्यांच्या ठायी असलेली नम्रता पाहिल्यावर मला खरंच वाटते की नतमस्तक कुठे व्हायचे, तर ते इथेच व्हायचे !

एकदा बाबासाहेब पुरंदरे यांना सांगितले गेले होते की सातारला आम्ही तुम्हाला पाऊल ठेवू देणार नाही. तुम्हाला पाय टेकवू देणार नाही. तर बाबासाहेब पुरंदरे सातारला आले आणि सांगितले, 'जिथे शिवाजीमहाराज राहिले, जिथे शिवाजीमहाराजांचे वास्तव्य होते, त्या अदालत राजवाड्यावर आणि जलमंदिरावर माथा टेकवण्यासाठी मी येतो, पाय टेकवण्यासाठी मी येत नाही!' त्यामुळे इथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला येथे माथा टेकवायला लागेल. इथली माती आपल्या कपाळाला लावूनच कर्तव्याची कास धरूनच पुढे जावे लागेल. मला माहिती नाही की या परिसरामध्ये सावरकर आले होते की नव्हते, परंतु सावरकर आले असतील, नसतील, परंतु सावरकरांचा विचार इथल्या नसानसामध्ये कणाकणामध्ये आम्हाला दिसतो आहे, जाणवतो आहे आणि तोच वारसा आणि तो वसा तुम्हा सर्वांना पुढे न्यायचा आहे. तुम्ही करत असलेल्या कामाचे चीज झाल्याशिवाय निश्चितपणाने राहणार नाही. प्रार्थना होऊन जर मेडिकलची मुलं येथे आत येत असतील; आज काय मेडिकल कॉलेजची अवस्था आहे, काय रॅगिंग नावाचा प्रकार सुरू आहे, अनेक ठिकाणी गेल्यानंतर मी जवळून या गोष्टी पाहिलेल्या आहेत, कितीतरी मुलांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. कितीतरी मुले वेडीपिशी झालेली आहेत. कितीतरी मुलांचे जीवन विमनस्क झालेले आहे. आयुष्य उध्वस्त झालेली आहेत. अशा वेळेला इतक्या शांत आणि निरामयपणाने तुम्ही इथे शिकता, प्रसन्न चित्ताने शिकता, त्यासाठी आपल्या आई-वडिलांना धन्यवाद द्या, त्यासाठी आपल्या नशिबाला धन्यवाद द्या. त्यासाठी

परमेश्वराचे दहा वेळा आभार माना, की मला या कॉलेजचे स्टुडंट होता आले. पूर्वी जशी एक पद्धत होती की गव्हर्न्मेंट मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनाच किंमत असायची. प्रायव्हेट मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना किंमत नसायची.

मी एमबीबीएसच्या मुलांसाठी सांगतो. मी एकदा सातवीच्या स्कॉलरशिपच्या बक्षीस समारंभाला गेलो, खटाव तालुक्यातील एक गाव. खटाव तालुका म्हणजे माणदेश. मघाशी मी जे सांगितले, ग. दि. माडगूळकर, शंकरराव खरात, व्यंकटेश माडगूळकर ज्या ठिकाणी घडले, त्यांनी आपले साहित्य ज्या ठिकाणी पणाला लावले, त्या सगळ्यांचा तो परिसर. आणि जिथे दैन्य, दुःख, दारिद्र्य असते ना, तिथे सरस्वती आशीर्वाद भरभरून देत असते आणि सरस्वतीच्या आशीर्वादाच्या जोरावर ती मुले यश मिळवत असतात. मी मेडिकल कॉलेजच्या मुलांना यासाठी सांगतो आहे, की तुम्हाला फक्त वैद्यकीय व्यवसाय करायचा आहे, वैद्यकीय पेशा करायचा आहे असे समजू नका. एक आदर्श मी तुम्हाला सांगतो तुमच्याच पिढीतल्या मुलाचा, डॉक्टर सुदाम खाडे, जो भोपाळला आहे सध्या, 'हेल्थ'चा डायरेक्टर आहे. पुढचा आरोग्य विभागाचा तो सचिव आहे. जेव्हा मी सातवीच्या बक्षीस समारंभाला गेलो होतो, त्या वेळेला मी सरांना विचारले की 'सर हा मुलगा जरा चमकता दिसतो आहे. पुढे काहीतरी भविष्यात घडेल, चांगले होईल'. ते म्हणाले, 'आमचे त्याच्यावर पूर्ण लक्ष आहे. आता आमच्या शाळेतून तो बाहेर पडणार आहे, तो ज्या हायस्कूलमध्ये जाईल, त्यालासुद्धा माझी मदत राहील आणि माझे त्याच्यावर लक्ष राहील.'

सहा बहिणी, उत्पन्नाचे साधन एक गाय, सात किलोमीटर चालल्याशिवाय डांबरी सडक दिसत नव्हती आणि दीड किलोमीटर चालल्याशिवाय त्याचे घर लागत नव्हते. गाव आल्यावरसुद्धा घर दीड किलोमीटरवर होते. अशा घरातला एक मुलगा. दहावीला बोर्डात पहिला येतो. बारावीला बोर्डात पहिला येतो. एमबीबीएसला राज्यामध्ये पहिला येतो. आणि ज्या वेळेला मी त्याला म्हणतो की 'अरे तू या क्षेत्रात आलास तर बरे होईल, तो म्हणतो मला 'एम. डी.' व्हायचे आहे'. हरिसन नावाचे पुस्तक आपल्यापैकी बऱ्याच जणांना माहिती असेल. अखंड हरिसन जे पुस्तक आहे, त्याची जी शेवटची आवृत्ती त्याची पाठ होती. हे मी आपल्याला एवढ्यासाठी सांगतो आहे की त्याला एम.डी. व्हायचे होते, एम.डी.चा कोर्स तीन वर्षांचा आहे. त्यांनी पुणे विद्यापीठाला विनंती केली, सर मला हा पंधरा महिन्यांमध्ये पूर्ण करायचा आहे, कारण मला 'आयएएस'ची परीक्षा द्यायची आहे. पंधरा महिन्यांमध्ये पूर्ण करायला विद्यापीठाने त्याला परवानगी दिली. त्याने सांगितले, तीन वर्षे माझे दिवस मोजू नका, तीन वर्षांत माझे कामाचे तास मोजा. आणि कामाचे तास मोजून विद्यापीठाने त्याला स्वतंत्रपणे परवानगी दिली. आणि त्याचे पेपर जपून ठेवलेले आहेत. आणि तो मुलगा १६ लाख मुलांमध्ये देशात पहिला आला, आणि तो आज इतके सुंदर आणि चांगले काम करतो आहे, की त्याने जवळजवळ दीड-दोनशे आयपीएस मुले तयार केली. सावरकरांचेच ते काम आहे. ते वेगळ्याचे काम नाही. तुम्ही निःस्पृह, निरपेक्ष, निरलस, निःस्वार्थी, स्वाभिमानी, जाज्वल्य देशाभिमानी असलेली, राष्ट्रप्रेमाची पिढी निर्माण करणे, यापेक्षा वेगळे काही नाही, की जे तुमच्या इथे घडते आहे !

मी सरांना मघाशी विनंती केली, आणि त्यांनी ती आपली जबाबदारी आहे म्हणून सांगितले. जर आपल्याला करता आले ना, तर मी करतो आहे त्या कामाच्या शेकडो पटीने काम तुमच्या या ठिकाणी होईल. आता तुमचे काम आहेच, तुम्हाला एक सोनेरी मुकुट आहेच, परंतु त्यात एक मोरपीस बसायला सुरुवात होईल. तुम्ही ते जर केलेत, स्पर्धा परीक्षेची तयारी, आपलीच मुले, ज्यांना आवड असेल, त्यांना एक-दोन तास वेगळी लायब्ररी करून दिली, पुस्तके पाहिजेत तर मी सर्वच्या सर्व पाठवीन. तुम्हाला काही कमी आहे म्हणून नव्हे, तर एक पॅटर्न म्हणून पाठवीन. जर तुम्ही यातल्याच मुलांना केले, तर कोणी आयएएस होईल, कोणी आयपीएस होईल, कोणी आयआरएस होईल, कोणी आयएफएस होईल, कारण हीच मुले देश चालवत असतात. मी खरे सांगतो आपल्याला, राजकीय लोकांच्या हातामध्ये शून्य आहे. त्यांचे हेलिकॉप्टर उतरू द्यायचे, त्यांना टेक ऑफ करू द्यायचा, की लँड करू द्यायचे की नाही, हे सगळे त्यांच्या हातात असते. पण तो तेवढा स्ट्राँग पाहिजे. आणि ते काम आम्ही आमच्या परीने छोट्या प्रमाणात करतो आहे. तुमच्याकडे एवढी सगळी हत्तीची ताकद आहे. भरभरून तुम्हाला आशीर्वाद आहे. तुम्ही स्वतःच विद्वान आहात. तुम्ही स्वतःच हुशार आहात, आणि तुमच्या इथे सारस्वताचा खरा मानकरी आज महाराजांच्या रूपाने बसलेला आहे. मला जर कोणी विचारले या भारताचा स्वर्ग कुठे आहे, तर मी डेरवणमध्ये स्वर्ग आहे म्हणून सांगेन. यापेक्षा काही वेगळा स्वर्ग नसतो. स्वर्गीय सुख इथेच आपल्याला मिळत असते. समीपता म्हणजे काय, सरूपता म्हणजे काय आणि सायुज्यता म्हणजे काय, हे सर्व या ठिकाणी पाहायला मिळते. आणि कुठेच या गोष्टी पाहायला मिळत नाहीत. कौतुकाचा विषय नाही, परंतु सुदैवाने ती वास्तवता तुमच्याकडे निर्माण झाली आहे.

सावरकर ज्या वेळेला उतारवयामध्ये गेले, त्या वेळेला त्यांच्या वाट्याला आलेले हाल या जिल्ह्याने पाहिले आहेत. 'आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी', तसे त्यांचे झालेले होते. आणि त्या वैरी झालेल्या प्रतिमेमध्येसुद्धा लोकमान्यांचा आदेश जो होता, 'आभाळ जरी कोसळले तरी त्याच्यावर पाय देऊन मी उभा राहीन, मी जगाला जे काही सांगायचे ते सांगेन !' बाकीची वाक्ये मी सांगत नाही. परंतु जे प्रतिकूल तेच घडेल हे समजून तुम्ही आयुष्याची वाटचाल करा, ही प्रेरणासुद्धा अनेकांच्या आत्महत्या वाचवू शकते.

ते सावरकर, ते लोकमान्य टिळक, या भूमीमध्ये, या परिसरामध्ये आम्हाला पाहायला मिळतात.

मघाशी मी गदिमांचे आपल्याला सांगतासांगता राहून गेले. गदिमा त्या ठिकाणी असे म्हणतात, जी मुले असतात, लव आणि कुश, त्या लवकुशांवर संस्कार करत असताना, म्हणजे विद्यार्थ्यांच्यावर केलेले संस्कार हे पुढे कसे यशस्वी होतात, तेच कसे उपयोगी पडतात पाहा. ते त्या ठिकाणी म्हणतात सुरुवातीलाच, 'नका सांगू रे नामग्राम ।' हे गुरुपरंपरा आहे म्हणून मी सांगतो. आपण म्हणाल गदिमांचे काय आज तुम्ही का सांगता आहात? ते काय म्हणतात गदिमा? ज्या वेळेला लवकुशांना विचारतील, 'अरे तुम्ही कोण आहात?' 'स्वये ऐकता नृप शत्रुंजय', म्हणजे श्रीराम स्वतः ऐकत असताना, 'संयत असू द्या मुद्राअभिनय । योग्य तेवढे बोला भाषण। गा बाळांनो श्रीरामायण ।। न च स्वीकारा धना-कांचना, नको दान रे, नको दक्षिणा ।'.. जे तुम्ही सांगता तेच. वेगळ्या भाषेमध्ये कशी परंपरा पुढे आली बघा. 'नका सांगू रे नामग्राम वा, स्वतःस माझे शिष्यच म्हणवा । स्वरात ठेवा हास्य गोडवा, योग्य तेवढे बोला भाषण, गा बाळांनो श्रीरामायण ।।'

गुरुपरंपरासुद्धा या संत वाङ्मयातूनच पुढे आलेली आहे. त्या प्रतिमांचे तुम्ही पूजन करता, प्रतिमासुद्धा आता कुठे किती पाहायला मिळतात? त्या प्रतिमा उतरवा, म्हणून माणसे मागे लागली आहेत. तुमच्या इथे मात्र त्या दिमाखाने उभ्या आहेत. ते इतके सुंदर पुतळे आहेत, प्रेरणा देणारे पुतळे आहेत. इतक्या सुंदर चांगल्या वातावरणामध्ये या मुलांना शिकायला मिळते आहे, फक्त त्यांना ते कळले पाहिजे की अरे हे चांगले आहे. मुले चांगली आहेत, आपल्याकडे सगळे चांगले आहेत, पण मुलांना हे कळले पाहिजे की अरे हे पितळ नाही, हे सोने आहे.

मॅडमनी मला शाळा दाखवली. मुलांकडे बघितल्यानंतर मला एक प्रसंग आठवतो. वर्गात एकदा इन्स्पेक्टर आले, त्या वेळी इन्स्पेक्टर शब्द होता शिक्षणाधिकाऱ्यांना. त्यांनी गणित घातले, वर्गातल्या मुलांना विचारले हे गणित सोडवा. मुख्याध्यापक होते, वर्गशिक्षक होते, एकाही मुलाला गणित सोडवता आले नाही. शिक्षकांनी, प्राचार्यांनी, जे कोणी असतील त्या-त्या वेळेचे शब्द, त्यांनी मान खाली घातली, 'ठीक आहे' म्हटले 'वर्ग सोडून द्या'. आणि एकएक मुलगा वर्गाच्या बाहेर गेला. जो शेवटचा मुलगा होता, त्याला शिक्षकांनी एक कानाखाली दिली. मुलगा रडत घरी गेला. आपल्या गल्लीमध्ये रडतरडत जाताना, मुले सगळी आजूबाजूला जमली. गावातील जरा श्रीमंताचे घर होते. घरच्यांनी येऊन शिक्षकांना प्रश्न विचारला, 'सर्वांचे चुकले, मग आमच्याच मुलाला का मारले? मारायचे तर सगळ्यांनाच मारायला पाहिजे होते. आमच्याच मुलाला का मारले?' सगळे गाव आल्यानंतर वर्गशिक्षकांनी असे सांगितले, 'ठीक आहे, माझे चुकले जर तुम्हाला वाटत असेल, तर मी तुमची जाहीर माफी मागतो. पण मी त्याला मारले एवढ्यासाठी, किमान तुलातरी आले पाहिजे होते, ही त्या विद्यार्थ्याबद्दलची भावना होती.' त्या भावनेचे विद्यार्थी आपल्याला घडवायचे आहेत.

पालक तसेच असतील. दर वेळेस पालकांना ज्ञान असेल असे नाही. परंतु, पट्टशिष्य कोण असतो? ज्याच्याकडून अधिक अपेक्षा केली जाते. ज्याची खरी परीक्षा बघितली जाते. ज्याला अग्निदिव्यातूनच जावे लागते. तीच त्याची खरी परीक्षा असते. ती परीक्षा बघतबघतच आपल्याला आयुष्याचा काळ काढावा लागतो. येणारा काळ तर इतका भयानक आहे, इतका भयानक आहे की मी परत एकदा आपल्याला जबाबदारीने सांगतो, ज्यांचे आता साठ झाले असतील, साठीच्या पुढे गेले असतील, त्यांना एक वेगळे आयुष्य जगायला मिळाले, परंतु जे विशीचे आहेत, तिशीचे आहेत, किंवा जे नव्याने जीवनात पदार्पण करत आहेत, या सर्व लोकांना येणाऱ्या काळामध्ये फक्त अध्यात्म वाचवू शकते, आणि ते अध्यात्म म्हणजे काय, अध्यात्म वाचायचे नसते, अध्यात्म आपल्याला वाचवते. अध्यात्म आपल्याला वाचायचे नाही, ते अध्यात्म जगायचे असते. ते अध्यात्म जगणे काय, ते मला या डेरवणमध्ये पाहायला मिळाले. ते मला येथे पाहायला मिळाले, तेच सावरकरांनी सांगितले. सावरकरांच्या सर्व चरित्राचा सार शेवटी काय आहे? 'उठा, काहीतरी करा, आळसाच जीणं । उषःकाली सांगतो तुम्हा मी ओरडोन ।' कशासाठी आपण पहाट झाल्यानंतरसुद्धा झोपत असतो? संस्कृती आपली एवढी चांगली आहे, की आई बाळाला घेते आणि म्हणते, 'अडगुलं मडगुलं सोन्याचं कडगुलं', लोकांना वाटते काय बडबडगीत आहे का? अरे बडबडगीत नव्हे, आड गोल, माड गोल, कडं गोल, गोल कायकाय असते त्याचा संस्कार आहे. 'मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर, आतां व्हतं भुईवर गेलं गेलं आभायांत ।' आत्ता या क्षणीसुद्धा भाषण कधी संपेल, जेवणाची वेळ झालेली आहे. आपल्याला जायचे आहे. काय नेमके सांगितले जाईल, तेव्हा सर काय म्हणतील, त्या मैत्रिणीचा निरोप काय असेल, त्या मित्राचे म्हणणे काय असेल, या विचारामध्ये आपण रंगलेलो असतो. एका क्षणामध्ये.

पण तेच समर्थ काय सांगतात, 'मनासी टाकिले मागे, गतीसी तुळणा नसे । अणूपासोनी ब्रह्मांडाएवढा होत जातसे ।।' अशी भीमरूपी आपल्याला शिकता आली पाहिजे. मला असे वाटते, की कॉलेजमध्ये, महाविद्यालयामध्ये जी तुमची प्रार्थना आहे, ती प्रार्थनासुद्धा इथे होते, हे भारतातील एकमेव उदाहरण असेल. आणि ती प्रार्थना म्हणताना आज जर तुम्हाला कंटाळा येत असेल, तेव्हा जर तुम्हाला आपला काहीतरी वेळ वाया जातोय असे वाटत असेल, तर तुमची निराशेकडे वाटचाल आहे असे समजा. जी

प्रार्थना म्हटल्याशिवाय मला वर्गात जाता येणार नाही, म्हणून नव्हे, पण ती प्रार्थना मला एका वेगळ्या टप्प्यावर नेते, माझ्या आयुष्याच्या एका वेगळ्या वळणावर मला नेते, जीवनामध्ये मी यशस्वी कसे व्हायचे, मला शिकवते, ते असेल तर त्या प्रार्थनेला अर्थ आहे. कवी म्हणतात ना, 'पुसणारे कोणी असेल, तर डोळे ओले होण्याला अर्थ आहे ।' 'पुसणे'ला दोन्ही अर्थाने, पुसणे म्हणजे विचारणे, आणि पुसणे असे पण पुसणे. 'कुणाचेच डोळे ओले होणार नसतील, तर मरणसुद्धा व्यर्थ आहे ।' त्यामुळे आपल्याला सतत मरणाचे भान पाहिजे. जीवनाच्या एका विशिष्ट टोकावर जात असताना आपल्याला जीवनाचा खरा अर्थ कळला पाहिजे. आज मी किती लोकांना मदत केली, आज मी माझे कर्तव्य काय बजावले? समर्थांच्या प्रपंचाचा अर्थ काही वेगळा आहे का? 'आधी प्रपंच करावा नेटका, मग परमार्थ साधावा विवेका ।' जो प्रपंचातील कर्मयोग तुम्ही लोक मानता, तोच समर्थांनी सांगितलेला आहे. 'तुम्ही प्रपंच नेटका कराल, तेणे तुम्ही विवेकी व्हाल । तुम्ही प्रपंच नेटका न कराल, तुम्ही कष्टी व्हाल ।।'

तो प्रपंच म्हणजे काय, तर प्राप्त परिस्थिती, हम दो हमारे दो नव्हे, प्राप्त परिस्थितीत आपल्या वाट्याला आलेले कर्तव्य, म्हणजे प्रपंच. मी वॉचमन असेन, माझे कर्तव्य. मी डॉक्टर असेन, माझे कर्तव्य. मी विद्यार्थी असेन, मी शिक्षक असेन, मी शिक्षिका असेन, मी सेवक असेन, मी कर्ता-करविता असेन, मी ॲडमिनिस्ट्रेटर असेन, हे म्हणजे कर्तव्य असे त्यांना सांगायचे आहे. आणि तो जो कर्मयोग त्यांनी सांगितला, तोच त्यांनी सांगितला. सगळ्या माणसांची एक लिंक आहे. मघाशी मला आपण दत्त महाराजांची परंपरा एका प्रतिमेतून दाखवली. ती परंपरा वेगळी नाही. ते सगळे लोक एकाच परंपरेतील आहेत. या सगळ्या परंपरेचे पाईक होण्याची पात्रता आपल्या अंगामध्ये यावी, म्हणून आपल्याला प्रयत्न करायचे आहेत. ती पात्रता निर्माण करण्याचे हे स्थान अतिशय पवित्र आहे.

हे वारंवार मी हे एवढ्यासाठी सांगतो आहे, की शेवटी नतमस्तक व्हावे, असे पायतरी आपल्याला दिसले पाहिजेत. हात जोडावेत, अशी व्यक्तीतरी आपल्याला दिसली पाहिजे. हे तुमच्या सर्व कामाचे स्वरूप जर जगासमोर आले ना, तर अन्य संस्था यातून बोध घेतील. मी काही ठिकाणी कळवलेसुद्धा रात्री, शैक्षणिक संस्थांची एखादी सहल काढून, किंवा काही परिषद घेऊन एक दिवसाची, तुम्ही लोकांनी जर काम दाखवले, खरंच धन्य होतील ती माणसे. प्रत्येकाचा मीपणा एक दहा टक्क्यांनी कमी आला, प्रत्येकाचा स्वार्थ एक दहा टक्क्यांनी कमी आला, तरीसुद्धा समाज फार पुढे जाऊ शकतो, आणि तेच आपल्याला करायचे आहे. काय होते, चांगल्याला चांगले म्हणायचे, औदार्य लोकांच्यात नाही. वाईटाला वाईट म्हणायचे धाडस सोडूनच द्या. प्रसंगी कोणी वाईटपणासाठी तरी म्हणतील वाईटाला वाईट, पण अलीकडे चांगल्याला चांगले म्हणण्याचे धाडसच उरलेले नाही. हे चांगले आहे, हे उदात्त आहे, हे अतिशय आकलनीय आहे, अनुकरणीय आहे, ते अनुकरणीय असलेले कामच लोकांपर्यंत पोहोचत नाही. म्हणजे मी सांगतो मलासुद्धा इथे येईपर्यंत हे एवढे मोठे काम आहे माहिती नव्हते. आता ते माझ्यापरीने मी ज्या ज्या कार्यक्रमांना जाईन, तेथे सांगेन की एकदा तरी तिथे डेरवणला जाऊन माथा टेकून या. डेरवणचे काम बघून या. कारण खरे सावरकर, खरे टिळक, आपल्याला जर काही बघायचे असेल, तर आपल्याला तिथे मिळतील.

एक सत्पुरुष जो काळ पुढे येणार आहे त्या संदर्भामध्ये म्हणतात, 'लाडू पेढे खावयास लोक जमती विशेष । परी साथ संकटास कोणी करी ना । हे तत्त्व ध्यानी धरा, ईश्वरासी आपुला करा । म्हणजे जन्म सफल होय खरा ।' ते आपल्याला कळले पाहिजे. जननिंदेचा खेद मानू नये. स्तुतीचा आनंद मानू नये. तेसुद्धा आपल्याला कळले पाहिजे. 'आहे तितुके देवाचे', हेही आपल्याला सांगता आले पाहिजे. आणि 'सरीवर सरी आल्या गं । सचैल गोपी न्हाल्या गं । गोपी झाल्या भिजुनी चिंब । थरथर कापती कदंब । पाने पिटती टाळ्या गं । सरीवर सरी आल्या ग ।।' हा निसर्गाचा आनंदसुद्धा आपल्याला या परिसरामध्ये येऊन घेता आला पाहिजे. मला वाटले सहज, आत्ता पाऊस नव्हता, पण मी जिथे थांबलो तिथून मी आजूबाजूला बघत होतो, मागेपुढे बघत होतो, जर समजा चुकून पाऊस पडला, तर बोरकरांनी कविता या निसर्गावरच केली आहे का, असे वाटावे, इतका फिरायलासुद्धा हा परिसर सुंदर आहे. म्हणजे सुंदर परिसर, सुंदर माणसे, म्हणजे खरंच हे अनाकलनीय आहे. काहीतरी ईश्वरी कृपा असल्याशिवाय ईश्वरी वास्तव्य असल्याशिवाय या गोष्टी वाट्याला येत नाहीत, किंवा या गोष्टी घडत नाहीत.

एका बाजूला कोणतेही क्षेत्र घ्या, आज माणसात माणूस राहिलेला नाही. आई आईचे कर्तव्य करत नाही. काय पहिल्यांदा आपल्याला सांगतात, कोणीतरी विचारले, 'बाबा घरात आहेत का?' तर बाबाच सांगतो, 'मी नाही' म्हणून सांग, जिथे तुम्हाला खोटं बोलायचा संस्कार केला जातो. आईला शंभर रुपये दिले, तर त्यातील दहा रुपये कसे बाजूला काढून ठेवायचे, बचत म्हणून ठीक आहे, पण ते चोरून ठेवले जातात. तिथे चोरीचा संस्कार केला जातो. हे सगळे संस्कार आजही सुरू आहेत. याला जर तिलांजली द्यायची असेल, तर आपल्याला संस्कृतीशिवाय पर्याय नाही, आणि मला संस्कृतीचे महत्त्व माहिती होते, पण शिस्तपण किती महत्त्वाची आहे, मी इथे आल्यानंतर कळले.

माझ्या कुठल्याही कार्यक्रमाला मी त्या कार्यक्रमाच्या दिवशीच जायचो. कार्यक्रमाच्या आधी पाचदहा मिनिटे लवकर नाहीतर बऱ्यापैकी उशिराच. कुठल्यातरी कारणाने उशीर व्हायचा. परंतु

आदल्या दिवशी मला यायला का सांगितले, याचे कारण मला आत्ता कळले. आता मला पुढचा एक प्रश्न विचारायचा आहे, एकच दिवस आधी मला यायला का सांगितले, असे मला आता वाटायला लागले! का त्यातसुद्धा शिस्तीचाच भाग आहे हे मला माहिती नाही! आठ दिवस येऊन राहीन मी. तर हे सगळे आल्यानंतर पाहिल्यानंतर काय बोलावे, करावे तेवढे कौतुक थोडे आहे. इथून घेऊनच गेले पाहिजे, ती प्रसन्नता, वात्सल्य.

त्या गाईंचा गोठा मी पाहिला. तिथली स्वच्छता मी पाहिली. जनावरांच्या नजरेमध्येसुद्धा कारुण्य दिसते. 'जिचे नेत्र चंद्रसूर्य, पहा उपेंद्र ।' आपण म्हणतो, त्या गाईच्या नेत्रांमध्ये. तर त्या वासरांचे डोळेसुद्धा लखलखीत दिसत होते. त्यांचे पोट कधी भरेल, तर त्यांना पुरेसे दूध ठेवून धार काढली तर. तेपण मी त्यातून पाहिले. हेच टिपायचे असते. 'उत्तम तितुके घ्यावे द्यावे' म्हणजे काय? आपल्याला यापेक्षा काही वेगळे असायचे कारणच नाही. याच्यापेक्षा काही वेगळे असूच शकत नाही. मी परवा एकदा सांगितले, की विद्यार्थ्यांनी मनात आणले आणि तरुणांनी मनात आणले, तर दोन टोके असतात. एक तरुण आणि एक सिनियर लोक. एक प्रशासक आणि एक सेवक. ज्या वेळेला प्रशासकही चांगला असतो आणि सेवकही चांगला असतो, ज्या वेळेला विद्यार्थीही चांगला असतो आणि शिक्षकही चांगला असतो त्याच वेळेला समाज चांगला घडतो. आणि तोच समाज या ठिकाणी आपल्या सगळ्या परिसरामध्ये मला दिसतो आहे. मला आपल्याला एक जरूर सांगायचे आहे, विनंती करायची आहे, की हे काम बाहेर कसे नेता येईल, कदाचित तुम्ही म्हणाल की आम्हाला क्वालिटीसाठी क्वांटिटी वाढवायची नाही आहे. शेवटी अपेक्षा कोणाकडून करायची?

साधू हा स्वतःची उन्नती करतो, आणि संत हा इतरांसाठी प्रयत्न करतो. संतत्त्व मला येथे दिसते आहे. त्या संतत्त्वामुळे मी तुमच्याकडून अपेक्षा करतो आहे, की समाजमनाची नाळ ओळखा. सगळेच जगामध्ये वाईट नाहीत. सगळीच प्रशासने वाईट नाहीत. आमच्या ग्रंथालयातून घडलेले अधिकारी असे आहेत, रस्त्याने जाताना त्याचे कार्यक्षेत्र सोडून एखाद्या देवाला जायचे असेल, तर आठ ते दहा रुपयांचे डिझेलचे चार्जेस शासनाकडे भरतात. असे अधिकारी आजही आपल्याकडे आहेत. ते अधिकारी कधी घडतील? जर तुमच्यासारख्या लोकांचे पाठबळ मिळाले तर.

आणि मला तर असे वाटते की त्यासाठीच हा योगायोग होता की काय मला माहिती नाही. परंतु माझ्याकडून सात हजार अधिकारी या २०-२५ वर्षांमध्ये घडले गेले. तलाठ्याच्यापासून आयएएस, आयपीएसपर्यंत घडले गेले, परंतु मला असे वाटते की ते तुम्ही सत्तर हजार करू शकता, ते तुम्ही सात लाख करू शकता. आणि शेवटी तुमच्यातूनच घडवायचे आहे. त्यासाठी तुम्हाला काहीही वेगळे करावे लागणार नाही. 'कुंभारासारखा गुरु नाही रे जगात, वरून धपाटा, आत आधाराचा हात ।' तरच मडके घडते. तरच त्या ठिकाणी कलश घडतो. तसेच वरून धपाटा पण आतून आधाराचा हात देणारे गुरुवर्य तुम्हाला लाभले. म्हणून तुम्ही लोक धन्य आहात, आणि ती धन्यता तशी निर्माण होत नाही. त्यात कोण लहान, कोण मोठा असा भेद काहीच नाही.

तुम्ही जर एकदा त्या दासबोधामधील काही गोष्टी वाचल्या, समर्थांनी साधू लोकांच्या उलटे सर्वाधिक लिहिलेले आहे. ढोंगी लोकांवर ताशेरे ओढलेले आहेत. त्या संतावर का अन्याय केला जातो, मला कळत नाही. समर्थांनीच सांगितले आहे, जातीभेद मानू नका. सावरकरांचे सूत्र ते तिथून आलेले आहे. समर्थांची आई त्यांना विचारते, 'तू ज्या रामाचा जप करतोस, राम कोणत्या जातीचा आहे?' समर्थ उत्तर देतात, 'अनाथांचा नाथ गे, त्यासी कैची जात गे, चोखामेळ्यासंगे जेवी, दहीदूधभात गे ।' हे सांगणारे समर्थ नाही येत लोकांसमोर! 'कोणी भेटो नर, धेड महार चांभार, त्याचे राखावे अंतर, या नाव भजन ।' जात म्हणून त्याचा उल्लेख नाही. योगायोगाने समाजव्यवस्था म्हणून ज्या काळात लोकांच्या वाट्याला ते आलेले आहे, त्यामुळे प्रत्येक जातीचा त्यांनी आदर केलेला आहे. प्रत्येक धर्माचा त्यांनी आदर केलेला आहे. हे सावरकर पुढे येत नाहीत. ते लोकमान्य पुढे येत नाहीत, की ज्यांनी जातिभेदाची लढाई केली. जातिभेदाविरुद्ध काही गोष्टी केल्या, जातिभेदासाठी जे लढले, आणि समानतेसाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले. हे संत वाङ्मयामध्ये सगळे आहे. जसे 'तुम्ही ऑपरेशन थिएटरमध्ये आम्हाला आत का येऊ देत नाही?' असे म्हणता येते का? एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे ते ठीक आहे, पण त्याच्या अलीकडे ते सर्व जसे समान आहेत, हा समानतेचा संदेश दिला आहे. पण इथल्या प्रत्येकाने जर ठरवले आपल्या गावात जाऊन सावरकर सांगायचे, आपल्या गावात जाऊन आंबेडकर सांगायचे, आपल्या गावात जाऊन लोकमान्य टिळक सांगायचे, तरच या संस्थेच्या कामाचे शेवटी 'या हृदयीचे त्या हृदयी' असे असते, तसे 'दिव्याने दिवा लागावा' तसे तुमचे काम दिसते.

मला मान्य आहे की इथल्या सगळ्यांना जमणार नाही. जमणे कठीण आहे, ती अपेक्षाही नाही. परंतु तुमच्या या परिसरामध्ये तयार झालेला विद्यार्थी हा बाहेर गेल्यानंतर तितक्याच तोलामोलाने वागावा, त्याच्या चालीवरून, त्याच्या बोलण्यावरून, त्याच्या वागण्यावरून, लोकांना कळले पाहिजे, हा डेरवणचा मुलगा आहे. हा डेरवणच्या मैदानातील खेळाडू आहे. तुमचे खेळाडूंचे मैदान पाहायला मी गेलो होतो. इथली नेमबाजी पाहिली, इथले रनिंगचे ट्रॅक्स पाहिले. स्वतःचे ॲनालिसिस कसे करावे या संकल्पना अन्यत्र नाहीत कुठे. पण अशा संकल्पना असतात, हेतरी कळले पाहिजे.

ते लोकांना कळणार कसे? कदाचित त्या सहलीमुळे तुम्हाला त्रासही होऊ शकतो. परंतु त्यातील लिमिटेशन्स लक्षात घेऊन मी तरी मुख्याध्यापक महासंघाला निश्चितपणाने कळवणार आहे की जाऊन तुम्ही पाहा. इथून पुढच्या माझ्या प्रत्येक व्याख्यानामध्ये पाच मिनिटे का होईना फक्त डेरवणसाठी असतील. शेवटी कसे असते, की आईला आई म्हटलेच पाहिजे ना आपण. 'प्रेमस्वरूप आई वात्सल्यसिंधू आई', प्रेमस्वरूप आई आम्हाला कुठे बघायला मिळते? इथेच पाहायला मिळते. ज्ञानेश्वरांना माउली का म्हणतात ते आपल्याला इथेच पाहायला मिळते. 'नाठाळाचे माथी हाणू काठी' म्हणणारे तुकाराम महाराज, आणि माउलीची ममता हे शेवटी संतत्व आपल्याला एकत्र पाहायला मिळते. सावरकर असू देत, टिळक असु देत, किंवा झाशीची राणी असू दे, हे तुमच्या स्त्री प्राध्यापकांकडून, संचालकांकडून आम्ही लोकांनी शिकले पाहिजे. प्रसंगी आपल्याला तेही होता आले पाहिजे. त्यासाठी तुमची मानसिकता करा. शिकवणारे खेळ शिकवतील, शिकवणारे अन्य काही शिकवतील. शिस्त तर तुमच्याकडे आहेच, पण मानसिक सामर्थ्य निर्माण करण्याचे काम आपल्याला केलेच पाहिजे. अन्यथा, सर्व आहे आणि काहीच नाही असे होता कामा नये. अध्यात्मामध्ये जसे आहे, 'गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा, रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा ।' 'हे तरी सर्वाठायी, पाहो जाता कोठेची नाही ।' तसे आपल्याला असले पाहिजे, आणि आपल्याला ते करता आले पाहिजे.

शेवटी कसे असते, की अरे ला कारे म्हणण्याची क्षमता जर निर्माण झाली नाही, तर कोणीही आपल्यावर अन्याय करत असतो. तेवढा आपला सरळपणा, साधेपणा, आणि सात्त्विकपणा आपल्याला उपयोगी पडत नाही. तो चांगल्यासाठी ठीक आहे. परंतु 'दुष्टान् शत्रून् विमर्दनत्वं जय जय भारत देश' यासाठी आपल्याकडे ती समर्थता पाहिजे. किमान आपल्याला कोणी वेडे म्हणू नये, कोणी भोळे म्हणू नये, कोणी भांबावलेले म्हणू नये, कोणी अर्धवट म्हणू नये. यासाठीसुद्धा तुमची नजर कशी पाहिजे? बाभळीच्या काठीसारखे दंड, भेदक नजर, भव्य कपाळ यासाठी करावा लागणारा व्यायाम, त्यासाठी केवळ शरीर चांगले असूनपण चालणार नाही, तर मनपण तुमचे चांगले पाहिजे. मनाचे सामर्थ्यपण तुमच्याकडे पाहिजे. उच्चारातूनसुद्धा तुमच्या शरीरातील रग, संघर्षाची तयारी, आणि न्यायाला न्याय म्हणण्याची चाड, अन्यायाविरुद्धची चीड, ती आपल्याला आलीच पाहिजे. पुढचा माणूस आपल्याला फसवतो आहे का? आपल्याला काय देतो आहे की नाही? नसेल तर स्वातंत्र्यवीर सावरकरांचे साधे जरी चरित्र वाचले, तर त्या चरित्रामधल्या क्षणाक्षणामध्ये, कणाकणामध्ये, शब्दाशब्दामध्ये अंगार आहे. तो अंगार फार महत्त्वाचा आहे. अशा काळामध्ये तुमचा नंदादीप आहे. 'वादळातला दिवा, हा अखंड नंदादीप, जळणार सतत जळणार, असाच तेवत जगती, नित प्रकाश देणार ।' नंदादीप डेरवणच्या रूपाने, समाजामध्ये आहे, फार मोठी समाधानाची, आनंदाची बाब आहे. मी परतपरत आपल्याला सांगतो, समानता ठीक आहे, कर्तृत्व ठीक आहे, पण या सगळ्यापेक्षा, येणाऱ्या काळाला संघर्ष करण्याची आक्रमकतेची मानसिकता. जसेजसे नवीननवीन साथीचे रोग येतात, त्यासाठी आपल्याला वेगळे सावध व्हावे लागते. नवीननवीन काही रोग येतात, त्यासाठी आपल्याला वेगळे करावे लागते. हे जसे तुम्हा डॉक्टर लोकांचे काम आहे, समाजामध्ये वेगवेगळ्या प्रवृत्ती ज्या निर्माण होत असतात, त्या निर्माण होणाऱ्या प्रवृत्तीला, रोखायची, भलेही विरोध नका करू पण निदान तुमच्यावर तर त्याचा परिणाम होणार नाही, एवढीजरी आपण खबरदारी घेतली, तरी खूप काही केल्यासारखे होईल, किंवा त्यांना मानवंदना दिल्यासारखे होईल.

त्यांचे कितीही आपण सांगितले तर ते इतके थोर लोक आहेत, की रामाच्यासुद्धा अशा प्रतिमाच असायच्या एका काळामध्ये. नंतर त्याची मंदिरे झाली. नंतर कृष्णाची मंदिरे झाली. राम-कृष्णाची मंदिरे कधी झाली? आधी प्रतिमा आणि नंतर मंदिरे. भविष्यामध्ये या लोकांची होणारच आहेत. सावरकरांचे मंदिर काही ठिकाणी आहे, काही ठिकाणी ते होणारच आहे. परंतु साक्षात् कार्यरूपाचे मंदिर म्हणजे डेरवण. हा परिसर हा कार्यरूपाचे मंदिर आहे.

आणि दुसरे एक महत्त्वाचे म्हणजे लोकमान्य आणि सावरकर यांचा समन्वय मला इथे साधलेला दिसतो आहे. म्हणजे एकाचा कडवेपणा तुमच्यात आहे, एकाची व्यापकता तुमच्यामध्ये आहे. तेल्यातांबोळ्यांचे नेते म्हणून संपूर्ण राष्ट्राने ज्यांना स्वीकारले आहे, ते लोकमान्यही तुमचे आहेत, आणि जाज्वल्य देशाभिमान आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा, प्रसंगी सर्वस्वाचे समर्पण करण्याची तयारी असे सावरकरही तुमच्याकडे आहेत. सावरकर आणि टिळक यांचा अत्यंत समन्वय एका उच्च पातळीवर जाऊन तुम्ही साधलेला आहे, या परमक्षणाला मी मनापासून धन्यवाद देतो, आणि जर मला बोलत असताना कोणती गोष्ट राहिली असेल, तर मी तुम्हाला एवढेच सांगतो, असा क्षण युगायुगातून येत असतो. मला इथे यायला साठ वर्षं व्हावी लागली. आधीच आम्ही यायला पाहिजे होते. आम्हाला इथे येऊन नतमस्तक होता आले पाहिजे होते. तुम्ही ज्या सर्व लोकांनी त्या कोणी आठ लाखाचे, कोणी दहा लाखाचे, कोणी पंधरा, कोणी सोळा लाखाचे इन्कम सोर्स सोडून तुम्ही इथे आलेला आहात, आयुष्याच्या उतारवयाकडे जात असताना, आयुष्याच्या अंतिम क्षणाकडे जात असताना, ज्या पेशंटला तुम्ही बरे करता, ज्या लोकांना तुम्ही दुःखकष्टातून बाहेर काढता, त्यांची असणारी कणव, त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य आहे, लाखमोलाचे आहे. रोज तुम्हाला तेवढे लाख मिळतात. एक हसला की एक लाख. ... एक डॉक्टर होते,

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

वैद्य म्हणून, कदाचित तुमच्या लोकांना माहीत असतील नसतील. त्यांना एकाने विचारले की तुमची संपत्ती काय आहे? त्यांनी दिलेले उत्तर मी आपल्याला सांगतो, की माझी संपत्ती माझी मुले नव्हेत, घरदार नव्हे. त्यांनी पेशंटकडे बोट दाखवले. हे पेशंट आहेत ना, हीच माझी संपत्ती आहे. जास्त लोकांना आपण सुखी करतो, समाधानी करतो, त्यांना जीवदान देतो, त्यांच्या जीवनाला अर्थ देतो, त्यांच्या वेदना कमी करतो, त्यांना वेदना होऊ नयेत किंवा असलेल्यांचे समूळ उच्चाटन व्हावे, त्यांच्याकडे तेवढी कार्यक्षमता तयार करतो. हे काम तुम्ही करता. आणि आज समाजामध्ये न परवडणारी अनेक औषधे आली असताना, परवडणारी औषधे निर्माण करून तुम्ही एक वेगळा पायंडा पाडत आहात, शासनाची मान्यता मिळो अगर न मिळो, त्याला राजमान्यता मिळेल, त्याला लोकमान्यता मिळेल, त्याबद्दल तुम्ही अत्यंत निःसंदेह राहा. शेवटी लोकांना हे हवे आहे. जिथे अतिरेक होतो, लोकशाहीचा अतिरेक म्हणजे झुंडशाही, आणि झुंडशाहीचा अतिरेक म्हणजे लोकशाहीची सुरुवात, क्रांतीची सुरुवात. ही क्रांतीची सुरुवात ही तुमच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे ती क्रांती इथून घडावी, त्या क्रांतीतून उत्क्रांती व्हावी, उत्क्रांतीच्या विचारातून समन्वय साधला जावा, आणि तुम्हाला अपेक्षित असलेले अध्यात्म, अपेक्षित असलेली शांती, अपेक्षित असलेले संस्कार, आणि ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग यांच्या सुरेख सुकर संगमातून एक चांगला समाज तयार व्हावा, चांगली गावे तयार व्हावी, 'दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।' हे परत एकदा आपल्या सर्वांना पाहायला मिळावे. आणि मला असे वाटते, की कोणीही कितीही दुःखी असेल, कोणी किती कष्टी असेल, तर तुमच्या परिसरामध्ये आल्यानंतर त्याला एक वेगळा गारवा मिळतो. या कार्य विस्ताराची बीजे आज तुमच्यामध्ये जागोजागी रुजली जावीत, अशी इच्छा व्यक्त करतो, अपेक्षा व्यक्त करतो, आणि स्पर्धा परीक्षा केंद्र आपल्या इथे तुमचे म्हणून सुरू व्हावे, ते जे सेवेचा संदेश, निःस्पृहतेचा संदेश, जो अध्यात्माचा संदेश देईल, आणि ते पाहण्याचा योग यावा अशी इच्छा व्यक्त करून मला बोलावल्याबद्दल धन्यवाद देतो, जय हिंद, जय महाराष्ट्र!''

सभेचे सूत्रसंचालन सौ. पल्लवी तेंडुलकर यांनी केले. आभारप्रदर्शन आणि 'वंदेमातरम्' राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. सभेला विद्यार्थीवर्ग, अध्यापकवर्ग तसेच संस्थेतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०